ePaper

# तर राज्यपालांची कृतीच अयोग्य ठरेल:कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम





| वर्ष - 7 | अंक -15 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


आतील पानांत


- पुणेकरांसाठी दिलासादायक निर्णय!
- राष्ट्रवादीचे स्वार्थी राजकारण!
- पुणे महापालिकेला १५० ते २०० कोटींचा फटका!


www.mahaenews.com | गुरुवार, दि. 11 मे 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांची

# हिंदूत्वाच्या दिशेने वाटचाल!

## » बहुचर्चित ‘दि केरला स्टोरी’ चित्रपटाच्या ‘मोफत शो’ चे आयोजन

### राजकारणातील वस्ताद माजी आमदार विलास लांडे यांचा नवा डाव

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पिंपरी-चिंचवड शहराच्या राजकारणातील ‘वस्ताद’ अशी ओळख असलेले माजी आमदार विलास लांडे यांचा राजकीय वारसदार राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांनी आता ‘हिंदूत्वा’ची वाट धरली आहे. संपूर्ण राज्यातील भाजपाविरोधी पक्ष आणि नेते जाहीरपणे विरोध करीत असताना, शहरातील या युवा आणि सुशिक्षित नेत्याने ‘दि केरला स्टोरी’ या चित्रपटाचे मोफत आयोजन करुन खळबळ उडवून दिली आहे.**









‘पुरोगामी महाराष्ट्र’, ‘फुले-शाहु-आंबेडकर’ या विचारधारेचे समर्थन करीत विलास लांडे यांनी शहरात एक काळ वर्चस्व गाजवले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचा ‘मास लिडर’ असलेला हा नेता गेल्या काही वर्षांपासून अर्थात २०१९ च्या विधानसभा निवडणुकांपासून ‘साईड ट्राईक’ केला जात आहे. प्रचंड अनुभव आणि ‘३-एम’ अर्थात ‘‘मॅन-मसल आणि मनी पॉवर’’ असतानाही राष्ट्रवादीच्या पक्षश्रेष्ठींकडून लांडे यांना मानपान मिळत नाही. त्यामुळे उद्विग्न झालेले माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांनी ‘रिस्क’ घेतली आहे का? असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात शहरात संघटनात्मक बदल करण्यात आले. त्यावेळी लांडे शहराध्यक्षपदासाठी तीव्र इच्छुक होते. मात्र, पक्षश्रेष्ठींनी शहराध्यक्षपदी अजित गव्हाणे यांना संधी दिली. नाते आणि राजकारण यामधील सीमारेषा पुसट झाली आणि राजकारणात नाते आले. गव्हाणेंना संधी देण्यात आल्यामुळे लांडे यांना ‘मार्गदर्शक’ या रांगेत बसावे लागले आहे. महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात मंत्रीपदाचा दर्जा असलेल्या एखाद्या महामंडळावर किंवा विधान परिषदेमध्ये लांडे यांना संधी मिळणे अपेक्षीत होते. मात्र, तसे झाले नाही. याउलट, क्षमता असतानाही लांडे यांना कायम डावलले आहे, ही वस्तुस्थिती आहे. अत्यंत संयमी राजकारणी असलेले लांडे यांनी हा अवमान पचवला आहे, पण त्यांचा मुलगा विक्रांत लांडे यांनी आपले ‘राजकीय करिअर’ स्वत:च्या हिंमतीवर करण्याची रणनिती ठरवलेली पहायला मिळते.

दुसरीकडे, विधी महाविद्यालयाच्या मंजुरीच्या निमित्ताने भाजपाचे ‘डिसिझन मेकर’ नेते व राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याशी विलास लांडे यांचा सलोखा निर्माण झाला आहे. त्यामुळे लांडे पिता-पुत्रांची भूमिका आगामी महापालिका, विधानसभा निवडणुकीत पिंपरी-चिंचवडमध्ये ‘किंगमेकर’ची राहील, असा दावा राजकीय जाणकार करतात.

### विक्रांत लांडे यांचे धाडस अन् नवे राजकीय संकेत...

» वास्तविक, विक्रांत लांडे इंद्रायणीनगर प्रभागातून नेतृत्व करतात. या परिसरात भाजपाचे मोठे वर्चस्व आहे. २०१७ च्या निवडणुकीत भाजपाची लाट असतानाही लांडे यांनी विजय खेचून आणला होता. विशेष म्हणजे, भाजपामधील मातब्बर उमेदवार समोर असताना लांडे यांनी धिराने निवडणूक लढवली आणि जिंकलीही होती. दरम्यान, गेल्या पाच वर्षांत लांडे यांनी आपली राजकीय चाल सावध ठेवली आहे. यापूर्वीही त्यांनी धार्मिक कार्यक्रमांवर भर दिलेला पहायला मिळतो. श्रीराम भागवत कथा, कीर्तन महोत्सव अशा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करीत त्यांनी भाजपाबहूल प्रभागात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. आता राज्यात राष्ट्रवादीसह सर्वच भाजपाविरोधी पक्षांनी ‘दि केरला स्टोरी’ चित्रपटाला विरोध केला. राष्ट्रवादीचे माजी मंत्री आणि आमदार जितेंद्र आव्हाड यांनी संबंधित दिग्दर्शकाला फासावर लटकवले पाहिजे, असे आक्रमक विधान केले. असे असतानाही राष्ट्रवादीचेच माजी नगरसेवक विक्रांत लांडे यांनी याच चित्रपटाचे मोफत शो आयोजित करण्याचे धाडस दाखवले. ही बाब निश्चितच नवे राजकीय संकेत देणारी आहे.

### राष्ट्रवादी आत्मचिंतन करणार काय?

» चिंचवड विधानसभा पोटनिवडणुकीत लांडे यांच्यासारखा तगडा नेता असताना निवडणुकीत राष्ट्रवादीची जबाबदारी मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यावर सोपवली होती. त्यामुळे विलास लांडे, संजोग वाघेरे, योगेश बहल यांच्यासह आमदार अण्णा बनसोडे यांच्यासारखी ज्येष्ठ मंडळी अधिकारहीन राहीली होती. वास्तविक, बहुतांश ज्येष्ठांच्या मते, दीड वर्षासाठी असलेली निवडणूक स्व. आमदार लक्ष्मण जगताप यांच्या स्मृतींचा आदर करुन बिनविरोध करावी. मात्र, तसे झाले नाही. राष्ट्रवादीतील एका गटाने निवडणूक लढवण्याबाबत निर्धार कायम ठेवला. परिणाम, या निवडणुकीत महाविकास आघाडीचा पराभव झाला. हा पराभवाची नैतिक जबबादारी राष्ट्रवादी काँग्रेसची होती. कारण, निवडणूक राष्ट्रवादीनेच प्रतिष्ठेची बनवली होती. राहुल कलाटे यांच्या बंडखोरीचे निमित्त झाले, पण खरा पराभव पक्षातील एक गट अलिप्त राहिल्यामुळेच झाला. याबाबत राष्ट्रवादीचे पक्षश्रेष्ठी आत्मचिंतन करणार आहेत काय? असा प्रश्न आहे.

# पुणेकरांसाठी दिलासादायक निर्णय!

## पाणी जपून वापरण्याच्या सूचना, आता 31 जुलैपर्यंत राहा टेन्शन फ्री...

। पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**यंदाच्या वर्षी सर्वसाधारण पाऊस होण्याचा तसेच पावसाळ्यात एल निनो सक्रिय असण्याच्या अंदाजाच्या पार्श्वभूमीवर, महापालिकेने विविध उपाययोजनांना सुरुवात केली आहे. त्यानुसार येत्या १८ मेपासून दर गुरूवारी संपूर्ण शहराचा पाणी पुरवठा बंद ठेवण्यात येईल, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. पण या सगळ्यात पुणेकरांसाठी एक आनंदाची हातमी आहे. कारण, पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला साखळी प्रकल्पांतर्गत धरणांमध्ये आजमितीला ९.६४ अब्ज घनफूट (टीएमसी) एवढा पाणीसाठा शिल्लक आहे. पुणे महापालिकेने पाणी पुरवठा संबधित एक मोठा निर्णय घेतला आहे. यामुळे पुणेकरांना पाणी जपून वापरण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पण यामुळे ३१ जुलैपर्यंत पुणेकरांना पाण्याची चिंता नसणार आहे.**



यानुसार, ३३.०८ टक्के पाणीसाठा शिल्लक असून गेल्या वर्षीच्या तुलनेत हा पाणीसाठा ०.६४ टीएमसीने अधिक आहे. मात्र, पाणीकपातीमुळे आणखी पंधरा दिवसांचा पाणीसाठा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे येत्या ३१ जुलैपर्यंत पुरेल एवढा धरणांमध्ये पाणीसाठा शिल्लक असल्याचे जलसंपदा विभागाने स्पष्ट केले आहे. शहराला खडकवासला, वरसगाव, पानशेत, टेमघर या धरणांमधून पाणीपुरवठा केला जातो. या धरणातील उपयुक्त एकूण पाणीसाठ्यापैकी निम्मा पाणीसाठा हा सिंचनासाठी राखीव ठेवण्यात येतो. पाण्याचे होणारे बाष्पीभवन, पाण्याची होणारी गळती यामुळे पाणीसाठा आणखी कमी होतो. तसेच खडकवासला धरणामधून दौंड तालुक्यातील गावांना पाणीपुरवठा केला जातो. धरणातून उन्हाळी पिकांसाठी चार आवर्तने सोडण्यात येतात. त्यामुळे सध्या तरी पुणे शहराला येत्या १५ जुलैपर्यंत पुरेल इतका पाणीसाठा शिल्लक राहील.

### 15 दिवस पुरेल एवढा पाणीसाठा आणखी उपलब्ध होईल

**पुणे शहराला दररोज दीड टीएमसी पाण्याची आवश्यकता लागते. त्यानुसार, महापालिका वर्षाकाठी १८ टीएमसी पाणी उचलते. पुणे महापालिकेने दर गुरुवारी पाणीकपात करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे धरणातील पाण्याची बचत होईल. म्हणजेच शहराला आणखी १५ दिवस पुरेल एवढा पाणीसाठा आणखी उपलब्ध होईल, असे जलसंपदा विभागाने सांगितले.**

# पुणे महापालिकेला १५० ते २०० कोटींचा फटका!

## महापालिका मिळकतकर थकबाकी वसुलीवर भर देणार

।पुणे। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मिळकतकरातील ४० टक्के सवलत पूर्ववत करण्याच्या निर्णयामुळे महापालिकेला १५० ते २०० कोटी रुपयांचा फटका बसणार आहे. त्यामुळे महापालिका आता मिळकतकर थकबाकी वसुलीवर भर देणार आहे. सध्या जवळपास ९,६०० कोटी रुपयांचा मिळकतकर थकीत आहे. परिणामी, महापालिका आता या थकबाकीदारांच्या मालमत्ता 'सील' करणे आणि वापरात बदल केलेल्या मिळकतींवर कारवाई करण्यावर भर देणार आहे.**

महापालिका आयुक्त तथा प्रशासक विक्रमकुमार यांनी ही माहिती दिली. विक्रमकुमार यांनी मंगळवारी मिळकतकर विभागाची बैठक घेऊन आढावा घेतला. या वेळी अतिरिक्त आयुक्त डॉ. कुणाल खेमनार, विभागाचे उपायुक्त अजित देशमुख, विधी विभाग प्रमुख ॲड. निशा चव्हाण आदी उपस्थित होते.

### या मिळकतींच्या वसुलीला प्राधान्य

प्रामुख्याने न्यायालयात कुठलाही वाद नसताना मोठ्या प्रमाणावर थकबाकी असलेल्या सुमारे १२ हजार ५०० मिळकतींवर लक्ष केंद्रीत करण्यात येणार आहे. यापैकी बहुतांश मिळकती या व्यावसायिक आहेत. या मिळकतींना वेळोवेळी नोटीसही बजावण्यात आल्या असून लवकरच त्या सील करून त्यांचा लिलाव करण्याची प्रक्रिया सुरू केली जाईल. मागील वर्षी तब्बल २५०० मिळकती सील केल्यानंतर त्यांच्याकडून सुमारे १८० कोटी रुपये थकबाकी वसूल करण्यात यश आले आहे. यावर्षी ही कारवाई अधिक गतीने आणि व्यापक स्वरूपात करण्यात येईल. यासाठी आवश्यक मनुष्यबळ देखील मिळकतकर विभागाला उपलब्ध करून देण्यात येईल, असे विक्रमकुमार यांनी नमूद केले.

### पुन्हा 40 टक्के सवलत

'महापालिकेने २०१९पासून नवीन कर आकारणी केलेल्या मिळकतींची ४० टक्के सवलत काढून घेतली आहे. 'जीआयएस मॅपिंग सर्व्हे'मध्ये ज्या जुन्या मिळकतींची आकारणी झाली, त्यांची ही सवलत काढून घेतली आहे. अशा साधारण एक लाख ६५ हजार मिळकतधारकांना २०१९पासून पुन्हा ४० टक्के सवलत देण्यात येणार आहे.



### 'मोबाइल टॉवर्स'ची सर्वाधिक थकबाकी

**मिळकतकर महापालिकेच्या उत्पन्नाचे सर्वांत महत्त्वाचे साधन आहे. मिळकतकरातून पालिकेला सर्वाधिक उत्पन्न मिळते. मात्र, गेल्या काही वर्षांत मिळकतकराची थकबाकी नऊ हजार कोटी रुपयांवर पोहोचली आहे. यात कराची मूळ मागणी तीन हजार ३० कोटी रुपये आहे, तर उर्वरित सहा हजार कोटी रुपयांची रक्कम तीनपट शास्ती आणि दंडाची आहे. मिळकतकर थकबाकीत सर्वाधिक थकबाकी 'मोबाइल टॉवर्स'ची आहे. २,७०० मोबाइल टॉवर्सपोटी सुमारे २,२७० कोटी रुपये थकीत आहेत. मात्र, हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे. विविध सरकारी कार्यालयांकडे १०६ कोटी रुपये मिळकतकर थकीत आहे. अन्य प्रकरणांत न्यायालयीन वादातील मिळकतींची सुमारे ८०० कोटी रुपयांची थकबाकी आहे. सुमारे चार हजार ४०० मिळकतींची दुबार नोंद झाल्याने त्याबाबत वाद आहेत. न्यायालयीन वादात असलेल्या ७०० खटल्यांत एक वर्षाहून अधिक काळापासून स्थगिती आहे. ही स्थगिती उठविण्यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.**

# बनावट प्रमाणपत्रे देणाऱ्यांना अटक

## छत्रपती संभाजीनगरमधील टोळी

। मणिपूर । महाईन्यूज ।

विविध कामांसाठी आणि कारणांसाठी दहावी उत्तीर्ण प्रमाणपत्र आवश्यक असल्याने अनेकांना या टोळीने गंडा घातल्याचे पोलिस तपासात आढळून आले आहे. दहावी आणि बारावीत अनुत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांकडून पैसे उकळून त्यांना उत्तीर्ण असल्याची बनावट प्रमाणपत्रे दिल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील टोळीने 'महाराष्ट्र स्टेट ओपन स्कूल'सारखी बनावट वेबसाइट सुरू करून हे 'उद्योग' करून दोन हजार जणांना बनावट प्रमाणपत्रे दिल्याचे तपासात उघड झाले आहे. या प्रकरणी गुन्हे शाखेने तिघांना अटक केली आहे.

### काय आहे प्रकरण?

कृष्णा सोनाजी गिरी आणि सय्यद इम्रान सय्यद इब्राहिम (रा. छत्रपती संभाजीनगर), अल्ताफ शेख (रा. परांडा, जि. धाराशिव) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. दहावी आणि बारावी अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना बनावट प्रमाणपत्र देण्यात



येत असल्याची माहिती गुन्हे शाखेला मिळाली होती. पोलिसांनी बनावट ग्राहक तयार करून संदीप ज्ञानदेव कांबळे (रा. सांगली) याच्याशी संपर्क केला. कांबळे याने दहावीच्या प्रमाणपत्रासाठी साठ हजार रुपयांची मागणी केली. बनावट ग्राहकाने ३९ हजार रुपये दिले. उरलेली रक्कम घेण्यासाठी संदीप कांबळे स्वारगेटला आला असता, त्याला सापळा रचून पकडण्यात आले. त्याच्याकडे केलेल्या चौकशीत प्रमाणपत्र देण्यासाठी अनेक ठिकाणी एजंट नेमल्याची माहिती मिळाली. दहावी उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र गरजेचे आहे, अशा विद्यार्थ्यांना कांबळे याच्यासारखे एजंट संपर्क साधत होते. त्यांच्याकडून पैसे घेऊन प्रमाणपत्र दिले जात होते. त्यासाठी ३५ हजार ते ५० हजार रुपये घेतले जात होते. गुन्हे शाखेचे उपायुक्त अमोल झेंडे आणि सहायक पोलिस आयुक्त नारायण शिरगावकर पुढील तपास करीत आहेत.

# स्पाईन रोड बाधितांच्या खांद्यावर बंदूक अन् राष्ट्रवादीचे स्वार्थी राजकारण!

## बाधितांचे प्रश्न सुटत असताना राजकीय स्टंटबाजी

**। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाच्या माध्यमातून ‘स्पाईन रोड’ विकसित करण्यात येत आहे. तळवडे येथील त्रिवेणीनगर चौकातून जाणाऱ्या या स्पाईन रस्त्यात बाधित होणाऱ्या एकूण १३२ रहिवाशांचा रखडलेला पुनर्वसनाचा प्रश्न तब्बल १४ वर्षे प्रलंबित होता. २००५पासून २०१९ पर्यंत तीनवेळा विधानसभा आणि दोन वेळा महापालिका निवडणूक झाली. हा मुद्दा राजकीयदृष्ट्या राष्ट्रवादीच्या अजेंड्यावर राहिला. पण, सोडवला नाही. आता राष्ट्रवादीचेच शहराध्यक्ष अजित गव्हाणे याच मुद्याचे पुन्हा राजकारण करु पाहात आहेत.**




विशेष म्हणजे, १३२ पैकी १२६ रहिवाशांच्या पुर्नवसनासाठी आवश्यक असलेला पेठ क्रमांक ११ येथील ६२८२.७२ चौरस मीटर वाढीव क्षेत्रफळाचा भूखंड ‘पीसीएनटीडीए’ महापालिकेकडे हस्तांतरित केला. कागदोपत्री पडताळणी करुन बहुतांशी बाधित नागरिकांना ‘लीज डीड’ करुन देण्यात आले. आठ ते दहा बाधित नागरिकांच्या समस्या आहेत. त्याबाबत प्रशासकीय पातळीवर सकारात्मक भूमिका घेतली जात आहे. स्पाईन रोडची जागा ताब्यात नसताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सत्ताकाळातच कामाला सुरूवात करण्यात आली. बाधितांनी विरोध केल्यानंतर रस्त्याचे काम थांबवण्यात आले. आजपर्यंत रस्ता सुरू झालेला नाही.

तत्कालीन सत्ताधारी राष्ट्रवादीचे माजी आमदार विलास लांडे या भागाचे प्रतिनिधीत्व करीत होते. त्यांच्या काळात बाधितांना न्याय मिळाला नाही. २०१७मध्ये झालेल्या महापालिका निवडणुकीत त्रिवेणीनगर- तळवडे प्रभागातून राष्ट्रवादीचे चार नगरसेवक निवडून आले होते. असे असतानाही या रस्त्याचे काम मार्गी लागले नाही. अजित गव्हाणे ज्यावेळी स्थायी समिती सभापती होते.

त्या काळातही स्पाईन रोड बाधितांचा प्रश्न सुटला नाही. असे असताना स्पाईन रोड बाधितांच्या आंदोलनामध्ये सहभागी होत गव्हाणे स्थानिक नागरिकांचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. अजित गव्हाणे यांचा राजकीय स्टंट म्हणावा की स्वार्थाचे राजकारण... असा प्रश्न स्थानिक पातळीवर उपस्थित केला जात आहे.

### वस्तुस्थिती काय सांगते?

स्पाईन रोड बाधितांना पर्यायी जागा देण्यासंदर्भात राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या सत्ताकाळात २०१४ मध्ये ठराव करण्यात आला. त्या ठरावानुसार, ५०० चौरस फुट जागा बाधित झालेल्या शेतकऱ्यांना ५०० चौरस फुट आणि त्यापैक्षा कितीही जास्त जागात बाधित असेल तर १ हजार चौरस फुट जागा देण्याचे निश्चित करण्यात आले. मात्र, एव्हढ्या कमी जागेत बाधित नागरिकांना परवानगी घेवून किमान हक्काचे घर उभारता यावे, अशी भूमिका घेत आमदार महेश लांडगे यांनी साडेबाराशे चौरस फूट जागा परताव्याबाबत शासनदरबारी आग्रह धरला. राष्ट्रवादीच्या तत्कालीन ठरावाविरोधात जागा बाधितांना साडेबाराशे चौरस फूट जागा परताव्याचा विषय मंजुर करुन घेण्यात आला. त्यामुळे आज प्राधिकरणात मोक्याच्या ठिकाणी बाधित नागरिकांना भूखंड उपलब्ध झाले. तसेच, १३२ बाधित नागरिकांपैकी ७० बाधितांचे ‘लीज डीड’ करुन जागांचा ताबा देण्यात आला. उर्वरित १५ फाईलचे दस्तनोंदणी प्रक्रिया सुरू आहे आणि १७ फाईल महापालिका प्रशासनाकडून पडताळणी सुरू आहे. ज्यांच्या घराच्या दोन फुटांवरुन रस्ता गेला आहे किंवा एकाच मालकाच्या नावाने दोन घरे आहेत, अशा तांत्रिक अडचणींमुळे काही बाधितांना प्रशासनाकडून अवास्तव अपेक्षा आहेत. मात्र, मोबदला किती मिळावा? याबाबत नियमावली आहे, ही बाब लक्षात घेतली पाहिजे, असा दावा स्थानिक सामाजिक कार्यकर्ते निलेश भालेकर यांनी केला आहे.

### महाविकास आघाडीच्या सत्ताकाळात काय केले?

राज्यात २०१९ मध्ये महाविकास आघाडीची सत्ता स्थापन झाली. अडीच वर्षे या सरकारमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी प्रमुख पक्ष होता. असे असतानाही अडीच वर्षांच्या काळात स्पाईन रोड बाधितांना न्याय मिळाला नाही. याउलट, भाजपा सत्ताकाळात तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पाईन रोड बाधितांना न्याय देण्यासाठी सकारात्मक भूमिका घेतली. आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकाराने भूखंड वाटपाला सुरूवात झाली. त्याची दस्तनोंदणीही सुरू आहे. पण, कागदोपत्री काही अडचणी असलेल्या बाधित नागरिकांच्या आंदोलनात सहभागी होत राष्ट्रवादीला या मुद्याचे राजकारण करावे लागते. ज्या समस्येचे मूळच राष्ट्रवादीच्या काळातील आहे, त्यासाठी अजित गव्हाणे यांना आंदोलन करावे लागणे म्हणजे “उंदराला मांजराची साक्ष” असा प्रकार आहे.

# अजितदादांच्या पाठबळामुळेच मी खासदार!

## डॉ. अमोल कोल्हे : ‘त्या’ विधानाला स्थानिक संदर्भ

**।पिंपरी । ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।**

**अजित पवार यांच्यामुळेच आपण खासदार होऊ शकलो. पक्षप्रवेश, उमेदवारी या गोष्टी त्यांनी मोठ्या साहेबांच्या माध्यमातून करवून घेतल्या, असे शिरुरचे राष्ट्रवादीचे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी सांगितले.**

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांना मुख्यमंत्री होण्यासाठी डॉ. अमोल कोल्हे यांनी नुकत्याच जाहीर कार्यक्रमात शुभेच्छा दिल्या होत्या. त्या संदर्भातील चिंचवड येथील मुलखतीमध्ये विचारलेल्या प्रश्नावर खुलासा करताना डॉ. कोल्हे म्हणाले की, हे विधान अजित पवार की जयंत पाटील असे तुलनात्मक पातळीवर नव्हते. त्यामागे स्थानिक संदर्भ होते.

अजित पवार यांच्यामुळेच आपण खासदार होऊ शकलो. पक्षप्रवेश, उमेदवारी या गोष्टी त्यांनी मोठ्या साहेबांच्या माध्यमातून करवून घेतल्या. अजितदादांचे पुत्र मावळ लोकसभा निवडणूक लढवत असतानाही तितकेच लक्ष अजितदादांनी शिरूरमध्ये दिले. त्यामुळेच अवघ्या 22 दिवसांच्या प्रचारात निवडणूक जिंकणे शक्य झाले, असेही अमोल कोल्हे यावेळी म्हणाले.


### अजित पवार विकासाचा चेहरा...

**लोकप्रिय चेहरा असला तरी अजितदादांचे भक्कम पाठबळ लाभले म्हणूच निवडणूक जिंकता आली, असे ते म्हणाले. अजितदादांनी नियोजनबद्ध पुणे, पिंपरी-चिंचवड शहर वसवले. पुणे जिल्हा हा मेडिकल टुरिझम व्हावा, यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू आहेत. वढू तुळापूर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या समाधी जीर्णोद्धारासाठी 250 कोटी रुपये उपलब्ध करून देणारे अजितदादा हे पहिले राजकीय नेते आहेत, असेही डॉ. कोल्हे म्हणाले.**






# प्रचारपटांचा 'खेळ'




'द केरल स्टोरी' या चित्रपटावर पश्चिम बंगाल सरकारने घातलेली बंदी, तमिळनाडूतील मल्टिप्लेक्स संघटनेने हा चित्रपट न दाखवण्याचा घेतलेला निर्णय, केरळ आणि तमिळनाडूच्या उच्च न्यायालयांनी बंदीची मागणी नाकारणे आणि यापैकी तमिळनाडू उच्च न्यायालयाच्या निर्णयास सर्वोच्च न्यायालयात मिळालेले आव्हान.. अशा वेगवान घडामोडींनंतर बुधवारी, पश्चिम बंगाल सरकारच्या निर्णयाविरुद्ध या चित्रपटाच्या निर्मात्यांची याचिका सर्वोच्च न्यायालयाने दाखल करून घेण्यास महत्त्व आहे. म्हणजे सर्वोच्च न्यायालयासमोर आता याच चित्रपटाविषयीच्या दोन याचिका आहेत : पहिली हा चित्रपट बंदीमुक्त ठरवण्याच्या निर्णयाला आव्हान देणारी- तिची सुनावणी १५ मेपासून सुरू होणार आहे. तर दुसरी पश्चिम बंगालने लादलेल्या बंदीचा विरोध करणारी- तिची सुनावणी 'निर्मात्यांचे आर्थिक नुकसान होते आहे' हा मुद्दा ज्येष्ठ वकील हरीश साळवे यांनी मांडल्यामुळे आता १२ मेपासून सुरू होणार आहे. मात्र म्हणून १२ मे रोजीच सोक्षमोक्ष लागेल असे नाही. न्यायालय योग्य वेळी निर्णय देईल आणि तो योग्यच असेल. पण 'केरल स्टोरी'सारख्या आणखी एका प्रचारपटामुळे काय परिणाम होणार आहेत, हे काही फक्त न्यायालयात ठरवले जाऊ शकत नाही. तो विषय व्यापक चर्चेचा आहे.

एकसुरी, एकपक्षीय, एकनेतृत्ववादी, एकधर्मनिष्ठ अशा प्रचारपटांचे परिणाम काय होणार, याविषयी साधकबाधक चर्चा करण्याइतपत शहाणपण बाकी आहे; तोवरच ती सुरू करणे आवश्यक ठरते. राजकीय प्रचारपटांची सवय आता देशाला झाली आहे. 'घर में घूंस के मारेंगे' या विधानाला प्रतिष्ठा मिळवून देणारा 'उरी', शास्त्रज्ञ महिला असल्यामुळे तिला तिच्या कल्पना स्वयंपाकघरातच सुचल्या, अशा प्रसंगातून महिलांचे खरे स्थान नकळतपणे दाखवून देणारा 'मंगलयान' हे चित्रपट हास्यास्पद असले तरी त्यांची बाजू घेणारे लोक अनेक होते आणि आजही असतील. कारण या चित्रपटांमधला हास्यास्पदपणा हा 'एकटा नायक दहा सशस्त्र गुंडांना लोळवतो' या प्रकारचा- बुद्धी बाजूला ठेवून पाहण्याचा नसून, बहुसंख्य प्रेक्षकांच्या राजकीय भावना सुखावणारा होता. या राजकीय भावना सत्ताधारी पक्षाने रचलेल्या कथानकाशी मिळत्याजुळत्याच असणार, हे उघड आहे. त्यामुळे एकीकडे राष्ट्रप्रेम, प्रगती आदींविषयीच्या ढोबळ कल्पना तसेच 'गिरे तो भी टांग ऊपर' प्रवृत्ती, तर दुसरीकडे कधीतरी झालेल्या अन्यायाबद्दल ऊरबडवेगिरी, अशा रंगपट्टिकेत ('स्पेक्ट्रम'मध्ये) या भावना असतात. ऊरबडवेगिरी करण्यासाठी निवडलेला कथित अन्याय जितका अलीकडचा, तितका राजकीय लाभ जास्त हेही उघड असते. त्यामुळे अन्यायाबद्दल अधिकाधिक अतिशयोक्ती करणे आणि अन्यायाशी लढू पाहणारी पात्रे आपलीच राजकीय भाषा बोलतील याची काळजी घेणे, हेही ओघाने आलेच.

'द कश्मीर फाइल्स' हा आंतरराष्ट्रीय पातळीवर सुमार ठरलेला- पण बहुसंख्याकवादी राजकीय भावना सुखावणारा प्रचारपट या सर्व अपेक्षा पूर्ण करणारा होता, त्या अर्थाने त्याला 'युगप्रवर्तक'सुद्धा ठरवले जाऊ शकते. त्या प्रचारपटाचा युगधर्म आता 'द केरल स्टोरी'देखील पाळणार, असे मानण्यास जागा आहे. या दोन चित्रपटांत काहीच साम्य नाही, हे युक्तिवाद म्हणून मान्य केले तरी 'द कश्मीर फाइल्स'ची शिफारस लोकसभेत करणाऱ्या पंतप्रधानांनी कर्नाटकमधील बेल्लारी येथील भाजपच्या प्रचारसभेत 'द केरल स्टोरी'चा ओझरता उल्लेख केला, एवढे एक साम्य निश्चितपणे दाखवता येईल. पण एखादे राजकीय कथानक – पोलिटिकल नॅरेटिव्ह- पुढे नेणाऱ्या प्रचारपटांशी तो कथानकवाद पटत नसणाऱ्यांनी कसे वागायचे, हा येत्या काळातला मोठा प्रश्न ठरतो आहे. आकांडतांडवी शैलीचेच राजकारण करणाऱ्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी 'द केरल स्टोरी'वर बंदी घातली. ही अशी राज्यापुरती बंदी घालण्याचे अधिकार गुजरातचे तत्कालीन मुख्यमंत्री असताना नरेंद्र मोदी यांनी किमान तीनदा (परझानिया- २००५ , फना- २००६ व फिराक – २००८) वापरले होते. यापैकी २००५ आणि २००८ मधील बंदीग्रस्त चित्रपट हे गुजरातमधील २००२ च्या दंगलीचा परिणाम टिपणारे होते आणि योगायोगाने त्या दोहोंमध्ये नसीरुद्दीन शहा यांच्या भूमिका होत्या. गुजरातमध्ये २००२ साली जे काही घडले ती दंगल नसून 'उत्स्फूर्त प्रतिक्रिया' होती, या मान्यतेच्या विरोधात अपप्रचार करणारे हे दोन चित्रपट होते. तर आमिर खानने नर्मदा बचाओ आंदोलनाला पाठिंबा दिला, म्हणून केवळ त्याच्या 'फना' या चित्रपटावर गुजरातने बंदी घातली होती. ममता बॅनर्जी आता असाच सत्तांधपणा करताहेत. प्रचारपटांचे स्वागत, त्यांचा बोलबाला हा राजकीयच असतो आणि राजकारण चोख असेल तर बंदीची गरज नसते, हे केरळच्या मुख्यमंत्र्यांनी मात्र ओळखले आहे.

## संपादकीय »

### कर्नाटकचे पेटते रण

***कर्नाटकातील प्रचार अखेर थांबला आहे. आजपासून कर्नाटकमध्ये मतदानाला सुरुवात होत आहे. कोण मारणार बाजी याकडे इतर राज्यांतील देखील लक्ष लागून आहे.***

कर्नाटकातील प्रचार आता थांबला आहे. आज तेथे मतदान होत आहे. संध्याकाळीच विविध वाहिन्यांच्या 'एग्झिट पोल'ची लगबग सुरू होईल. आधीच्या 'ओपिनियन पोल'मधून वेगवेगळी भाकिते पुढे आली आहेत. लोकसभेच्या निवडणुकांना जेमतेम वर्षभराचा कालावधी उरला आहे. कर्नाटक हीच भारतीय जनता पक्षासाठी दक्षिण सीमा आहे. पुढे तो नाही. कर्नाटकाच्या वर महाराष्ट्रातली राजकीय रणधुमाळी दिसतेच आहे. या पार्श्वभूमीवर २०२४मध्ये विजय मिळवायचा असेल, तर भाजपच्या दृष्टीने २२४ मतदारसंघांच्या कर्नाटक विधानसभेत चांगली कामगिरी करणे आवश्यकच आहे. दुसरीकडे, काँग्रेस तेथे नवी भरारी घेण्याची उमेद बाळगून आहे. कर्नाटकाचा सारा प्रचार भ्रष्टाचार, लिंगायत या महत्त्वाच्या जातीबद्दलचे कथित उद्गार, भाजपच्या बोम्मई सरकारचा नाकर्तेपणा यांना वळसे घालून शेवटी 'बजरंग बली की जय' या मैदानात येऊन ठेपला आहे.

**केंद्र सरकारने १ मे २०१६ रोजी देशभरातील गृहनिर्मिती व्यवसायावर वचक ठेवण्यासाठी स्थावर संपदा कायदा (रेरा) संमत केला. या कायद्यातील सर्व कलमे १ मे २०१७ पासून लागू करण्यात आली. राज्यात त्याच दिवशी महाराष्ट्र स्थावर संपदा प्राधिकरणाची (महारेरा) स्थापना झाली.**

## 'महारेरा'चा वचक आहे कुठे?



देशात हे प्राधिकरण स्थापन करणारे महाराष्ट्र पहिले राज्य ठरले. परंतु प्राधिकरणाकडून होणारा प्रकरणांचा निपटारा आणि प्रत्यक्ष वसुली आदेशांची अंमलबजावणी पाहता ग्राहकांना दिलासा मिळत आहे का, याचे उत्तर नकारार्थी आहे. या परिस्थितीला शासनाची सदस्य नियुक्तीतील तर जिल्हाधिकाऱ्यांची वसुलीतील उदासीनता कारणीभूत असली तरी महारेराही तितकेच जबाबदार आहे. गेल्या सहा वर्षांत महारेराला ग्राहकांचा विश्वास संपादन करता आलेला नाही, हेही तितकेच जाणवते.

या कायद्यानुसार रखडलेले, सुरू असलेले, पूर्ण झालेले पण निवासयोग्य प्रमाणपत्र (ओसी) नसलेले आणि नव्याने येऊ घातलेले सर्व गृहप्रकल्प महारेराकडे नोंदवणे बंधनकारक झाले. गृहप्रकल्पाची सद्य:स्थिती, किती सदनिकांची विक्री झाली व त्याद्वारे आलेली रक्कम आदींचा तपशील महारेराच्या संकेतस्थळावर अद्ययावत करणे आवश्यक ठरले. या कायद्यानुसार संबंधित गृहप्रकल्पापोटी जमा केलेल्या एकूण रकमेच्या ७० टक्के रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेत महारेरा नोंदणी क्रमांकाच्या नावे खाते उघडून जमा करणे व त्यातूनच प्रकल्पाचा खर्च करणे आवश्यक ठरले. यासाठी सनदी लेखापाल व प्रकल्पाच्या वास्तुविशारदाने दिलेले प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाणार होते. विकासकांनी खरोखरच त्याचे पालन केले आहे का, याची तपासणी करणारी यंत्रणा महारेराने पहिल्या पाच वर्षांत स्थापन केली नाही. अजोय मेहता अध्यक्ष झाल्यानंतर त्यांनी रखडलेल्या प्रकल्पांबाबत स्वतंत्र कक्ष स्थापन केला. या कक्षाने सर्वच स्तरांवर तपासणी सुरू केली आणि अनेक विकासक नियमांचे पालन करीत नसल्याचे आढळले. आता नव्याने नोंदणी झालेल्या प्रकल्पांची तपासणी सुरू झाली आहे. त्यामुळे यापुढे तरी विकासकांवर वचक बसेल असे दिसते. पण आतापर्यंत जे झाले त्याचा फटका असंख्य ग्रहकांना बसला आहे. त्यांना 'तारीख पे तारीख'चा अनुभव येत आहे. ताब्याची तारीख जवळ आली की, सहा महिने वा वर्षभराची किंवा कधी दोन वर्षांची मुदतवाढ प्रकल्पाला मिळत आहे. मुदतवाढ उलटून गेली तरी प्रत्यक्ष ताबा नाही वा भरलेले पैसे परतही मिळत नाहीत, अशा चक्रव्यूहात ग्राहक अडकला आहे. मुदतवाढीसाठी ग्राहकांची संमती आवश्यक असते. बहुतेकदा ही संमती बळजबरीने मिळविली जाते. 'महारेरा'कडूनच उदासीनतेचा अनुभव येऊ लागल्याने ग्राहक हतबल झाला आहे. रेरा कायद्याचा हेतू ग्राहकाला घराचा ताबा मुदतीत मिळवून देणे हा आहे.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827.
(विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# सत्तासंघर्षाचा सर्वोच्च फैसला!

## शिंदे सरकारच्या भवितव्यासह घटनात्मक गुंतागुंतीचा उलगडा होण्याची शक्यता

।अमरावती । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**संपूर्ण देशाचे लक्ष लागून राहिलेल्या राज्यातील सत्तासंघर्षावर आज, गुरुवारी सर्वोच्च न्यायालय निकाल देणार आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंसह शिवसेनेच्या १६ आमदारांच्या अपात्रतेसह सत्तासंघर्षातील महत्त्वाच्या घडामोडींची घटनात्मक वैधता निश्चित होणार आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठ सकाळच्या वेळात राज्य सरकारचे भवितव्य ठरविणारा हा महत्त्वाचा निकाल देईल. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील पाच सदस्यीय घटनापीठ सकाळच्या वेळात राज्य सरकारचे भवितव्य ठरविणारा हा महत्त्वाचा निकाल देईल.**



शिवसेनेमध्ये गेल्या वर्षी जूनमध्ये फूट पडल्यानंतर उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकार कोसळले. त्याआधी विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी शिंदेंसह त्यांच्यासोबत गेलेल्या १६ आमदारांना अपात्रतेची नोटीस बजावली होती. मात्र, या कारवाईवर सर्वोच्च न्यायालयाच्या तीन सदस्यांच्या खंडपीठाने हंगामी स्थगिती दिली होती. त्यानंतर तत्कालीन राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांनी भाजपच्या पाठिंब्यावर एकनाथ शिंदे यांना सरकार स्थापन करण्यासाठी पाचारण केले व राज्यात नवे सरकार अस्तित्वात आले. या सर्व प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचे हंगामी आदेश, शिवसेनेतील फूट, आमदारांची अपात्रता, राज्यपालांची भूमिका आदी विविधांगी सखोल चर्चा करण्यासाठी सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली पाच सदस्यांच्या घटनापीठाची स्थापना करण्यात आली होती. न्या. हिमा कोहली, न्या. एम. आर. शहा, न्या. पी. एस. नरसिंहा आणि न्या. कृष्ण मुरारी यांचा या घटनापीठात समावेश होता. १० महिन्यांपूर्वी दाखल झालेल्या विविध याचिकांवर सुनावणी घेतल्यानंतर घटनापीठाने १६ मार्च रोजी निकाल राखून ठेवला होता. "न्यायव्यवस्था विकली गेली...

दिल्ली सरकार आणि नायब राज्यपाल यांच्या अधिकारकक्षा आणि महाराष्ट्रातील सत्तासंघर्ष या दोन महत्त्वाच्या खटल्यांच्या निकालाचे वाचन केल्यानंतर समिलगी विवाहावरील सुनावणी घेतली जाईल, असे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. गुरुवारी सरन्यायाधीशांसमोर सादर होणाऱ्या तातडीच्या याचिकांवरील सुनावणी घेतल्यानंतर घटनापीठ सत्तासंघर्षावरील निकालाच्या आदेशाचे वाचन करणार आहे.

### आज निकाल का?

**» घटनापीठातील एक सदस्य न्या. एम. आर. शहा १५ मे रोजी निवृत्त होणार असल्याने हा निकाल या आठवड्यामध्ये लागणे अपेक्षित होते. घटनापीठासमोर मंगळवार, बुधवार आणि गुरुवार असे तीन दिवस सुनावणी होते. सोमवार व शुक्रवारी घटनापीठ शक्यतो कामकाज घेत नाही. शनिवार-रविवार न्यायालयाला सुट्टी आहे. शहा यांच्या कामकाजाचा सोमवारी अखेरचा दिवस असून त्यादिवशी घटनापीठाचे कामकाज होण्याची शक्यता नाही. त्यामुळे घटनापीठाचे कामकाज गुरुवारी होणार असल्याने दोन्ही खटल्यांचे निकाल उद्याच जाहीर होतील.**

### निकालाच्या केंद्रस्थानी असलेले मुद्दे..

» १६ आमदारांच्या अपात्रतेच्या कारवाईवर हंगामी स्थगिती देण्याचा खंडपीठाचा निर्णय योग्य होता का?

» विधानसभाध्यक्षांविरोधात अविश्वास नोटीस बजावली असेल तर त्यांना कारवाईचे अधिकार आहेत का? त्यांचे अधिकार कधीपासून खंडित होतात?

» आमदारांना अपात्र ठरवण्याचा अधिकार सर्वोच्च न्यायालयाला आहे की, विधानसभा अध्यक्षांनीच हा निर्णय घ्यावा?

» नबाम रेबिया निकालाचा पुनर्विचार करणे गरजेचे आहे का?

' आमदारांच्या अपात्रतेला स्थगिती दिली, मग ठाकरे सरकारच्या बहुमताच्या चाचणीला स्थगिती का दिली नाही?

» सर्वोच्च न्यायालयाच्या हस्तक्षेपामुळे सत्ताबदल झाला असेल तर घड्याळाचे काटे उलटे फिरवून राज्यपालांचा निर्णय रद्द करता येईल का?

» पक्षांतर्गत बंदी कायद्यातील अनुसूची १०चा गैरवापर झाला आहे का?

### अपात्रतेची टांगती तलवार

एकनाथ शिंदे, संजय शिरसाट, भरत गोगावले, संदीपान भुमरे, तानाजी सावंत, अब्दुल सत्तार, लता सोनवणे, बालाजी कल्याणकर यामिनी जाधव, प्रकाश सुर्वे, अनिल बाबर, बालाजी किणीकर, महेश शिंदे, चिमणराव पाटील, रमेश बोरनारे-पाटील, संजय रायमुलकर.

# ...तर राज्यात मोठ्या घडामोडी आणि पडझड पाहायला मिळेल!

## सुप्रीम कोर्टाच्या निकालावर कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांचे भाष्य

।मुंबई । महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**एकीकसर्वोच्च न्यायालय महाराष्ट्रातील सत्तासंघर्षावर १६ आमदारांच्या अपात्रतेचा मुद्दा आणि इतर काही याचिकांवर न्यायालय काय निर्णय देणार, याकडे सर्वांचं लक्ष लागलं आहे. न्यायालयाच्या निर्णयाबाबत सत्ताधारी आणि विरोधी पक्षाकडून विविध तर्क-वितर्क लावले जात आहेत. अशी एकंदरीत स्थिती असताना कायदेतज्ज्ञ असीम सरोदे यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या संभाव्य निकालावर मोठं भाष्य केलं आहे.**

सर्वोच्च न्यायालयाने सुनील प्रभू यांना मान्यता दिली, तर महाराष्ट्राच्या राजकारणात मोठ्या घडामोडी आणि राजकीय पडझड पाहायला मिळेल, असं विधान असीम सरोदे यांनी केलं आहे. त्याचबरोबर एकनाथ शिंदे यांच्यासह १६ आमदार अपात्र ठरले तर शिंदे गटातील इतर २४ आमदारही अपात्र ठरतील, असंही असीम सरोदेंनी नमूद केलं. महाराष्ट्राच्या सत्तासंघर्षावर भाष्य करताना असीम सरोदे म्हणाले, "उद्या महाराष्ट्राच्याच नव्हे, तर भारताच्या पक्षांत्तराच्या संदर्भातील प्रवृत्तीवर आणि पक्षांत्तर बंदी कायद्याच्या संदर्भात हा अत्यंत महत्त्वाचा निर्णय असणार आहे. याचे दूरगामी परिणाम भारताच्या राजकारणावर होतील. गेल्या काही काळात एका पक्षातून निवडून येणं आणि दुसऱ्या पक्षात जाणं, पक्षांत्तर करणं, पक्ष फोडणं, या सगळ्याच गोष्टी सातत्याने वाढत गेल्या आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर त्या वाईट प्रवृत्तीचा कडेलोट होईल, अशी परिस्थिती आता निर्माण झाली आहे. याची दखल सर्वोच्च न्यायालयाने गंभीरपणे घेतली तर संपूर्ण निकाल न्यायालयच देईल. कोण पात्र आहे? कोण अपात्र आहे? कुणाची चूक आहे? कुणी घटनाबाह्य काम केलं? या सगळ्याची नोंद या निकालामध्ये असेल." शिंदे गटाचे १६ आमदार अपात्र ठरले, तर सरकारवर काय परिणाम होईल? असं विचारलं असता असीम सरोदेंनी सांगितलं, "केवळ १६ नव्हे तर इतर २४ आमदारांसंदर्भातील याचिका सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे.



### सर्व आमदार अपात्र ठरवले जातील

**» शिवसेनेनं आणि उद्धव ठाकरेंनी सुनील प्रभू यांना 'प्रतोद' म्हणून नेमलं होतं. त्यांनी काही व्हीप जारी केले होते. त्या व्हीपचा अनादर करणारे सर्व आमदार अपात्र ठरू शकतात. पण सर्वोच्च न्यायालयाच्या निकालात कुणाला 'प्रतोद' म्हणून मान्यता मिळते? हे पाहणं गरजेचं आहे. सुनील प्रभूंना 'प्रतोद' म्हणून मान्यता मिळाली, तर महाराष्ट्रात खूप मोठा राजकीय बदल पाहायला मिळेल. त्याचबरोबर मोठ्या राजकीय घडामोडी आणि पडझड पाहायला मिळेल. न्यायालयाने सुनील प्रभूंना 'प्रतोद' म्हणून मान्यता दिली, तर अपात्रतेच्या रेषेवर उभे असणारे सर्व आमदार अपात्र ठरवले जातील."**

# पाकिस्तानात हिंसाचाराचा आगडोंब!

## 7 ठार, 300 जखमी; तीन प्रांतांमध्ये सैन्य तैनात, इम्रान खान यांना 8 दिवसांची कोठडी

।इस्लामाबाद । महाईन्यूज ।

**पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना अल-कादीर विश्वस्त मंडळ भ्रष्टाचारप्रकरणी आठ दिवसांची नॅशनल अकाउंटेबिलिटी ब्युरो (एनएबी) कोठडी सुनावण्यात आली. इम्रान यांना बुधवारी एनएबी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. त्यापूर्वी, इस्लामाबादमधील जिल्हा आणि सत्र न्यायालयाने तोशखाना भ्रष्टाचार प्रकरणात आरोप निश्चित केल्यामुळे इम्रान यांच्या अडचणींमध्ये वाढ झाली आहे.**

एनएबीने इम्रान खान यांची १४ दिवसांची कोठडी मिळावी अशी मागणी केली तर त्यांच्या वकिलांनी त्यांच्या मुक्ततेची मागणी केली. कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती लक्षात घेऊन इम्रान यांना ठेवलेल्या इस्लामाबादमधील न्यू पोलीस गेस्ट हाऊसचे रूपांतर न्यायालयात करण्यात आले. अल-कादीर विश्वस्त मंडळाने केलेल्या भ्रष्टाचारामुळे सरकारी तिजोरीचे ५ हजार कोटी रुपयांचे नुकसान झाल्याचा आरोप आहे.

त्यापूर्वी, इस्लामाबाद जिल्हा आणि सत्र न्यायालयाने तोशखाना भ्रष्टाचार प्रकरणात इम्रान यांच्याविरोधात आरोप निश्चित केले. इम्रान पंतप्रधान असताना त्यांना मिळालेल्या किमती घड्याळांसारख्या महागड्या भेटवस्तू त्यांनी तोशखाना विभागाकडून स्वस्तात विकत घेतल्या होत्या असा त्यांच्यावर आरोप आहे. नियमानुसार लोकप्रतिनिधी आणि सरकारी अधिकारी यांना मिळालेल्या भेटवस्तू तोशखाना विभागाकडे जमा कराव्या लागतात. यासंबंधी केलेल्या व्यवहारांसंबंधी लपवाछपवी केल्याचा आरोप आहे.

दरम्यान, पाकिस्तान तेहेरिक-ए-इन्साफ (पीटीआय) या पक्षाने इस्लामाबाद उच्च न्यायालयाच्या निकालाविरोधात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली. भ्रष्टाचार प्रकरणात इम्रान खान यांना मंगळवारी झालेल्या अटकेचे उच्च न्यायालयाने समर्थन केले. त्याविरोधात ही याचिका दाखल करण्यात आली. इम्रान यांच्यावर ठेवण्यात आलेले भ्रष्टाचाराचे आरोप हे गलिच्छ आणि सूडाचे राजकारण असल्याची टीका पीटीआयने केली.



### भारतीय नेत्यांकडून संमिश्र प्रतिक्रिया

अस्थिर पाकिस्तान हा भारतासह सर्व देशांसाठी धोकादायक आहे असा इशारा जम्मू आणि काश्मीरचे माजी मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी दिला. भारताच्या दृष्टीने पाकिस्तानात लोकशाही मजबूत होणे आवश्यक आहे. त्यामुळे दोन्ही देशांमधील संबंधही सुधारतील असे ते म्हणाले. तर पाकिस्तानातील लोकशाही डळमळीत असली तरी न्यायपालिका, प्रसारमाध्यमे प्रस्थापितांना जबाबदार धरत आहेत ही काळ्या ढगांची रुपेरी किनार आहे, अशी प्रतिक्रिया पीडीपीच्या नेत्या मेहबुबा मुफ्ती यांनी दिली.

### तीन प्रांतांमध्ये सैन्य तैनात

पाकिस्तानच्या पंजाब, खैबर पख्तुनख्वाह आणि बलुचिस्तान या प्रांतांमध्ये कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी सैन्य तैनात करण्यात आले आहे. इम्रान खान यांना अटक झाल्यापासून पाकिस्तानात हिंसक निदर्शने सुरू झाली आहेत. क्वेट्टा, कराची, रावळपिंडी आणि लाहोर यासह इतर शहरांमध्ये निदर्शने सुरू आहेत. इम्रान यांचे समर्थक आणि सुरक्षा बलांमध्ये झालेल्या संघर्षांमध्ये आतापर्यंत सात जणांचा मृत्यू झाला आहे तर ३०० पेक्षा जास्त जखमी झाले आहेत. पीटीआयच्या समर्थकांनी पंजाब प्रांतामध्ये किमान १४ सरकारी आस्थापनांना आगी लावल्याची माहिती पोलिसांनी दिली. एकट्या पंजाबमध्ये आतापर्यंत १ हजार १५० जणांना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये पीटीआयच्या वरिष्ठ नेत्यांचा समावेश आहे. लाहोर आणि अन्य शहरांमध्ये परिस्थिती तणावपूर्ण आहे. लाहोरमध्ये लोक रस्त्यावर उतरल्यामुळे शहराचा उर्वरित देशाशी संपर्क तुटला आहे. हिंसक आंदोलकांवर कारवाई केली जात असल्याचे पोलिसांतर्फे सांगण्यात आले. पाकिस्तानच्या 'असोसिएटेड प्रेस ऑफ पाकिस्तान'च्या कार्यालयाचीही तोडफोड केली. निदर्शकांनी इस्लामाबादमध्ये आंतरराष्ट्रीय विमानतळाकडे जाणारा रस्ता अनेक तास रोखून धरला. सिंध प्रांतामध्ये संचारबंदी लागू करण्यात आली असून २७० जणांना अटक करण्यात आली आहे.

### शरीफ यांना क्लिन चीट

इस्लामाबाद : एनएबीने पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि मुलगा हमजा यांना आर्थिक गैरव्यवहार प्रकरणात क्लिन चीट दिली. यामुळे शरीफ पितापुत्रांना मोठा दिलासा मिळाला आहे. १६ अब्ज पाकिस्तानी रुपयांच्या गैरव्यवहार प्रकरणाचा पुन्हा तपास केल्यानंतर हे दोघेही निरपराध असल्याचे दिसून आले, असे एनएबीकडून जाहीर करण्यात आले.

# कर्नाटकमध्ये ७२ टक्के मतदान

।बंगळूरु । महाईन्यूज ।

कर्नाटक विधानसभा निवडणुकीसाठी बुधवारी ७२ टक्के मतदान झाले. विधानसभेच्या २२४ जागांसाठी पार पडलेल्या मतदानात रामनगर येथे सर्वाधिक ७८.२२ टक्के मतदान झाले होते. बंगळूरु शहरमध्ये ४८.६३ टक्के मतदान झाल्याचे निवडणूक अधिकाऱ्यांनी सांगितले. मागील विधानसभा निवडणुकीत कर्नाटकात एकूण ७२.३६ टक्के मतदान झाले होते.

कर्नाटक निवडणुकीसाठी येत्या शनिवारी मतमोजणी होऊन निकाल लागणार आहे.

या निवडणुकीत भाजप, काँग्रेस आणि माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांच्या धर्मनिरपेक्ष जनता दलात तिरंगी लढत झाली. निवडणुकीसाठी पाच कोटी ३१ लाख मतदारहोते. दोन हजार



६१५ उमेदवार रिंगणात होते. मतमोजणी दि.१३ मे रोजी होणार आहे.

### सीमाभागात चुरस

कोल्हापूर : सीमाभागात मतदानात उत्साह दिसून आला. सायंकाळी सहा वाजता मतदानाची वेळ संपली तरीही काही केंद्रांमध्ये रांगा लागलेल्या होत्या. बेळगाव जिल्ह्यातील अठरा विधानसभा मतदारसंघात सरासरी ७३ टक्के मतदान झाले. मतदानाची टक्केवारी वाढली असल्याने एकीकरण समितीच्या ५ उमेदवारांच्या निकालाकडे लक्ष वेधले आहे.

# तीन राज्यांचा समलिंगी विवाहाला विरोध!

## केंद्र सरकारची सर्वोच्च न्यायालयात माहिती

।नवी दिल्ली । महाईन्यूज ।

**राजस्थान, आंध्र प्रदेश आणि आसाम या तीन राज्यांचा समलिंगी विवाहाला विरोध असल्याचे केंद्र सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयाला सांगितले. समलिंगी विवाहाच्या मुद्द्यावर आपल्याकडे सात राज्यांचा प्रतिसाद आला असून त्यापैकी या तीन राज्यांनी त्याला विरोध केल्याची माहिती केंद्राने दिली. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. संजय किशन कौल, न्या. एस आर भट, न्या. हिमा कोहली आणि न्या. पी एस नरसिंह यांच्या घटनापीठासमोर यावरील सुनावणी सुरू आहे.**



महान्यायअभिकर्ता तुषार मेहता यांनी केंद्र सरकारची बाजू मांडताना सांगितले की, मणिपूर, उत्तर प्रदेश, महाराष्ट्र आणि सिक्कीम या राज्यांनी या मुद्द्यावर गहन आणि सविस्तर चर्चा आवश्यक असून तातडीने उत्तर सादर करता येणार नाही असे कळवले आहे. सुनावणीदरम्यान भारतीय कायद्यांनुसार एकट्या व्यक्तीला मूल दत्तक घेण्याचा अधिकार आहे असे न्यायालयाने स्पष्ट केले. आदर्श कुटुंबामध्ये स्वत:ची जैविक मुले असतात, पण यापेक्षा वेगळी परिस्थिती असू शकते हे कायद्याला मान्य आहे असे न्यायालयाने नमूद केले. लिंग ही संकल्पना अस्पष्ट असू शकते पण आई व मातृत्व ही संकल्पना अस्पष्ट नाही असा युक्तिवाद राष्ट्रीय बाल हक्क संरक्षण आयोगाने (एनसीपीसीआर) केला. त्यावर न्यायालयाने आपले मत मांडले. आपले सर्व कायदे भिन्नलिंगी दाम्पत्याच्या मुलांचे हितसंबंध आणि कल्याण यांचे संरक्षण करतात. भिन्नलिंगी जोडप्यांची मुले आणि समलिंगी जोडप्यांची मुले यांच्यामध्ये भेद करण्याची सरकारची भूमिका रास्त आहे असा दावा अतिरिक्त महान्यायअभिकर्ता ऐश्वर्या भाटी यांनी केला. समलिंगी विवाहाला कायद्याचे संरक्षण मिळाल्यास भारताच्या सांस्कृतिक मुळांना हादरा बसेल असा दावा राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित 'संवर्धिनी न्यास' या संघटनेने सर्वोच्च न्यायालयाला पत्र लिहून केला. समलिंगी विवाह कायदेशीर केल्यास हिंदू विवाह कायद्याच्या उद्देशालाच हरताळ फासला जाईल अशी भीती या संघटनेने व्यक्त केली आहे. इतर धर्म आणि पाश्चात्त्य देशांमधील उदारमतवादी विचारांचा भारतावर प्रभाव वाढत असून त्यामुळे हिंदू धर्माच्या स्वरूपावर परिणाम होत आहे अशी चिंता संवर्धिनी न्यासाने पत्रात व्यक्त केली आहे.

# द केरला स्टोरी सिनेमाला अनुराग कश्यपचा फुल सपोर्ट

द्वेष आणि हिंसाचाराची कोणतीही घटना घडू नये, यासाठी पश्चिम बंगालमध्ये वादग्रस्त चित्रपट 'द केरला स्टोरी' प्रदर्शित करण्यावर तत्काळ बंदी घालण्याचे आदेश राज्याच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी दिले. या आदेशावरून सर्वत्र टीकेचा सूर असून, चित्रपटाच्या निर्मात्यांनी



याविरोधात कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा दिला आहे. तर अनेक कलाकारांनीही चित्रपटाला बंदी घालणं चुकीचं म्हटलं आहे. ममता बॅनर्जींच्या या निर्णयानंतर बॉलिवूड दिग्दर्शक अनुराग कश्यप यानं अप्रत्यक्षपणे विरोध दर्शवला आहे. त्यानं एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यानं अप्रत्यक्षपणे त्याचं मत मांडलं आहे.

**काय म्हणाला अनुराग कश्यप?**

तुम्ही चित्रपटाशी सहमत आहात की नाही, प्रोपोगंडा आहे की, विरोधात आहे, आक्षेपार्ह आहे की नाही...पण बंदी घालणं चुकीचं आहे, असं अनुरागनं म्हटलं आहे. तसंच सुधीर मिश्रा यांच्या 'अफवाह' या चित्रपटाला त्यानं पाठिंबा दिलाय. त्यानं पुढं म्हटलं आहे की, तुम्ही लढायला हवं. हा अफवाह चित्रपटी पाहायला हवा, जो सोशल मीडियाद्वारे पसरवण्यात येणाऱ्या अफवा, आणि त्यामुळं निर्माण होणाऱ्या मतांवर भाष्य करतो. दरम्यान, अभिनेत्री शबाना आझमी यांनी देखील द केरला स्टोरी चित्रपटावर बंदी घालणं चुकीचं असल्याचं म्हटलं आहे. 'आमिर खानचा 'लाल सिंह चड्ढा' प्रदर्शित होऊ न देण्याची मागणी करणं जितकं चुकीचं होतं, तितकंच 'द केरला स्टोरी'वर बंदीची मागणी करणारे चुकीचे आहेत', अशी टिप्पणी ज्येष्ठ अभिनेत्या शबाना आझमी यांनी सोमवारी केली.

बॉलिवूडसोबतच टॉलिवूडमध्येही आपल्या अभिनयाच्या जोरावर वेगळं स्थान निर्माण करणारी अभिनेत्री आहे मृणाल ठाकूर. मृणाल गेल्या 10 वर्षांपासून चित्रपटसृष्टीत सन्मान मिळवण्यासाठी धडपडत आहे आणि आता तिच्या या प्रयत्नांना यश आले आहे. 'सीतारामम' चित्रपटातून तिचा अभिनय मोठ्या पडद्यावर झळाळून उठला आहे. 'बाटला हाऊस', 'जर्सी' आणि 'सुपर 30' यांसारख्या चित्रपटांतून आपला ठसा उमटवणाऱ्या मृणाल ठाकूरचा सीताराममही चांगलाच गाजतोय.

# मृणाल म्हणते,"बॉलिवूडपेक्षा टॉलिवूड परवडलं!"



2012 मध्ये मृणाल ठाकूरने 'मुझसे कुछ कहते हैं, ये खामोशियां' या मालिकेतून कॅमेऱ्यासमोर आपले कौशल्य दाखवण्यास सुरुवात केली. २०१८ साली 'लव्ह सोनिया' या चित्रपटात ती पहिल्यांदा मोठ्या पडद्यावर दिसली. त्यानंतर सुपर ३० सारख्या चित्रपटांमधून आपल्या अभिनयाची छाप पाडली आहे

# तुम्ही बसा भांडत... प्रेक्षकांना चित्रपटापेक्षा सीरिजमध्ये रस

भारतीय प्रेक्षकांना इंग्रजीसह इतर भाषेतील वेब सीरिजची भुरळ पडली असतना भारतीय सीरिजबद्दल तेवढीच उत्कंठा असल्याचं पाहायला मिळतंय. वेबविश्वात रहस्यमय, नाट्य, ॲक्शन, थरार, कौटुंबिक नाट्य, विनोद या प्रकारातल्या कथांचा समावेश असतो. विविध सीरिजच्या माध्यमातून नावारुपाला आलेल्या अनेक प्रतिभावंत कलाकारांचं प्रेक्षक तोंडभरुन कौतुक करताना दिसतात. ओटीटीमुळे (ओव्हर द टॉप) पुढे आलेल्या काही कलाकारांनी तर प्रसिद्धीच्या बाबतीत बॉलिवूडच्या दिग्गज मंडळींनाही मागे टाकलंय. अशीच उत्सुकता गाजलेल्या काही भारतीय सीरिजच्या पुढच्या सीझनबद्दलही आहे. येत्या काळात अनेक वेब सीरिजचे पुढचे सीझन प्रेक्षकांच्या भेटीस येण्यास सज्ज आहेत.

## तिसऱ्या पर्वाची प्रतीक्षा

सीरीजच्या पहिल्या सीझनमध्ये गाजलेली व्यक्तिरेखात दुसऱ्या सीझनमध्ये काय कमाल करते, याची प्रेक्षकांना उत्सुकता असते. मनोज वाजपेयीची मुख्य भूमिका असलेल्या 'द फॅमिली मॅन'मध्ये ॲक्शन-थ्रीलरसह फॅमिली ड्रामा पाहायला मिळाला. उत्कंठा कायम ठेवणारी संहिता व मांडणी, कलाकारांनी व्यक्तिरेखेतले दाखवलेले बारकावे आणि दुसऱ्या सीझनमधील दाक्षिणात्य अभिनेत्री समंथाच्या एंट्रीमुळे दुसरा सीझन विशेष लक्षात राहिला. दुसऱ्या सीझनच्या शेवटी तिसऱ्या सीझनची झलक दाखवण्यात आली, त्यामुळे प्रेक्षकांची उत्सुकता कैकपटीनं वाढली आहे. 'मिर्झापूर' सीरिजमधील पंकज त्रिपाठीने साकारलेली भूमिका गाजली. बेकायदेशीर व्यवसाय, राजकारणात प्रवेश आणि



कौटुंबिक कलहानं परिपूर्ण असलेल्या या सीरिजच्या दोन सीझननी प्रेक्षकांचं निखळ मनोरंजन केलं. त्यामुळे तिसऱ्या सीझनची उत्कंठा आहे. तर ग्रामीण भागातील समाजव्यवस्था, राजकारण या विषयांवर हलक्याफुलक्या पद्धतीनं भाष्य करणारी सीरिज म्हणजे 'पंचायत'. या सीरिजमध्ये मुख्य भूमिकेत असलेला अभिनेता जितेंद्र कुमार प्रेक्षकांच्या पसंतीस उतरला. या सीरिजच्या तिसऱ्या सीझनची चर्चा सुरू आहे. याप्रमाणे 'दिल्ली क्राइम'च्या तिसऱ्या सीझनसाठी प्रेक्षक आतुर आहेत.

गाजलेल्या सीरिजच्या नव्या सीझनची उत्सुकता असतानाच २०२३च्या सुरुवातीला अनेक नव्या सीरिज प्रेक्षकांच्या भेटीला आल्या. अभिनेता राणा डुग्गूबाटीची मुख्य भूमिका असलेल्या 'राणा नायडू' या सीरिजनं प्रेक्षकांचं लक्ष वेधलं. या सीरिजच्या सगळ्या एपिसोडना दिलेली ॲक्शन, ड्रामा आणि थराराची फोडणी प्रेक्षकांनी चवचवीनं चाखली. या सीरिजच्या दुसऱ्या सीझनमध्ये नाट्य कशाप्रकारे आकाराला येतं हे पाहण्यासारखं असेल. 'फर्जी' या सीरिजमधील शाहीद कपूरचा लूक प्रेक्षकांना भावला. सदर सीरिजमध्ये दाक्षिणात्य अभिनेता विजय सेथुपतीसह अभिनेत्री राशी खन्नानंदेखील आपल्या अभिनय कौशल्याची चुणूक दाखवली आहे.

# दाक्षिणात्य चित्रपटांवर विवेक ऑबेरॉयने सोडले मौन

बॉलिवूड अभिनेता विवेक ऑबेरॉयने इंडस्ट्रीतील चित्रपटाच्या निवडीबद्दल तसेच आपल्या मानधनाबद्दल एका मुलाखतीत नुकतेच भाष्य केले. चित्रपट चांगला असेल तर आपण फि कमी करण्यास तयार असल्याचेही तो बोलला.

बॉलिवूड अभिनेता विवेक ओबेरॉयने चित्रपटसृष्टीत दोन दशकांहून अधिक काळ पूर्ण केला आहे. अनेक चित्रपटांमधून त्याने आपल्या प्रेक्षकांची मने जिंकण्यात यश मिळवले. नुकतेच या अभिनेत्याने इंडस्ट्रीतील त्याच्या चित्रपटांच्या निवडीबद्दल आणि फीबद्दल खुलेपणाने आपले मत व्यक्त केले आहे. त्याने हिंदी चित्रपटांव्यतिरिक्त इतर भाषेतील चित्रपटांमध्ये काम करण्याचा निर्णय कसा व का घेतला याबद्दल सांगितले.

दाक्षिणात्य चित्रपटांमध्ये काम करण्याच्या आपल्या निर्णयाबद्दल बोलताना अभिनेता विवेक ओबेरॉय




म्हणाला की, मी ठरवले आहे की मला प्रत्येक दक्षिण भारतीय भाषेत चित्रपट करायचे आहेत, हिंदी चित्रपटसृष्टीत मी जितके शुल्क आकारू शकतो तितके शुल्क इतर कुठेही आकारू शकत नाही. मी फुकटात काम करु शकत नाही त्यामुळे मी माझे शुल्क कमी करीन. तसेच मी माझ्यासाठी अशक्य असलेल्या भाषेत काम करण्यासाठी कठोर परिश्रम घेण्यास तयार असल्याचे त्याने सांगितले. कमी फी घेण्याबाबत बोलताना अभिनेता विवेक ऑबेरॉय म्हणाला की, पैशासाठी काम करणाऱ्या आणि बेजबाबदारपणे चित्रपट निवडणाऱ्या लोकांना मी आधीपासून ओळखतो, पण मी यापासून दूर आहे. याआधी मी पैशांसाठी म्हणून किंवा अभिनेता म्हणून एका असुरक्षितपणामुळे काम केले होते. पण आज मी जिथे उभा आहे, हे स्थान मिळवल्यावर मला आता असे काम करण्याची गरज नाही हे माझ्या लक्षात आले आहे. पैशांसाठी मी चित्रपट निवडत नाही, त्यामुळे चित्रपट निवडताना मी खूप काळजी घेतो.

# मराठी इंडस्ट्री 'द केरला स्टोरी'ला पाठिंबा का देत नाहीये?: अमृता खानविलकर

मुंबई- लोकप्रिय अभिनेत्री अमृता खानविलकर हिने मराठीसोबतच हिंदी चित्रपटांमध्येही काम केलं आहे. तिने तिच्या अभिनयाने प्रेक्षकांना आपलंसं केलं. तिची 'चंद्रमुखी' चित्रपटातील भूमिका विशेष गाजली. मात्र सध्या सिनेसृष्टीमध्ये वेगळाच गदारोळ सुरू आहे. 'द केरला स्टोरी' चित्रपटाने प्रेक्षकांचं लक्ष वेधून घेतलं आहे. मात्र त्यात 'महाराष्ट्र शाहीर'कडे प्रेक्षकांचा ओघ कमी होताना दिसतोय. यावर दिग्दर्शक केदार शिंदे यांनी राजकारण्यांना धारेवर धरत नुकतीच पोस्ट केली होती. मराठी राजकारणी 'द केरला स्टोरी' चे शो मोफत दाखवत आहेत पण त्यांनी मराठी चित्रपटासाठी असं कधीही केलं नाही. आता याच विषयावर एका चाहत्याने अमृताला देखील प्रश्न विचारला आहे. मराठी सिनेसृष्टी 'द केरला स्टोरी' ला पाठिंबा का देत नाहीये अशी विचारणा त्याने केली आहे. त्यावर अमृताने देखील उत्तर दिलं आहे.

चाहत्याने अमृताला प्रश्न विचारत लिहिलं, 'मॅडम, 'द केरला स्टोरी'ला मराठी सिनेसृष्टी प्रमोट का नाही करत? सध्या सर्वच तरुण या चित्रपटाला प्रोत्साहन



देतायत, त्यामुळे लोकांची अपेक्षा आहे की अनेक आघाडीच्या कलाकारांनीही हे केलं पाहिजे. मला माहीत आहे की हे तितकं सोपं नाही, पण जर जास्त लोकांनी केलं तर ते अवघडही नाही' नेटकऱ्याच्या या प्रश्नावर अमृताने त्याला शांतपणे उत्तर देत लिहिलं, 'कारण मी सध्या लंडनमध्ये आहे आणि अजून तरी हा चित्रपट पाहिलेला नाही. 'महाराष्ट्र शाहीर' पाहिला आणि त्याला प्रमोटही केलं. तुम्ही पाहिला का?' असा प्रश्न तिने नेटकऱ्याला विचारला. त्यावर उत्तर देत नेटकऱ्यानेही 'हो माझं पहिलं प्राधान्य मराठी चित्रपटाला आहे.

# सीएसकेचा दणदणीत विजय!

## दिल्ली प्लेऑफच्या शर्यतीतून जवळपास बाहेर: दिल्ली कॅपिटल्सचा 27 धावांनी पराभव

। कोलकाता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**आयपीएल २०२३ च्या ५५ व्या सामन्यात चेन्नई सुपर किंग्जने दिल्ली कॅपिटल्सचा २७ धावांनी पराभव केला. एमए चिदंबरम स्टेडियमवर दोन्ही संघ आमनेसामने आले होते. चेन्नईचा कर्णधार महेंद्रसिंग धोनीने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. चेन्नईने २० षटकांत आठ गडी गमावून १६७ धावा केल्या. प्रत्युत्तरात दिल्ली कॅपिटल्स संघ २० षटकांत ८ गडी गमावून १४० धावाच करू शकला.**



मात्र, या पराभवानंतर डेव्हिड वॉर्नरच्या संघाच्या प्लेऑफमध्ये पोहोचण्याच्या आशांना मोठा धक्का बसला आहे. त्याचवेळी चेन्नई सुपर किंग्जचे १५ गुण झाले आहेत. मात्र, चेन्नई सुपर किंग्ज आणि दिल्ली कॅपिटल्सच्या सामन्यानंतर गुणतालिकेत कोणताही बदल झालेला नाही. गुणतालिकेत दिल्ली कॅपिटल्स शेवटच्या स्थानावर आहे. मात्र चेन्नई सुपर किंग्जने नंबर- २ वर आपले स्थान मजबूत केले आहे.

१६८ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्ली कॅपिटल्सची सुरुवात खराब झाली. चेन्नईकडून पहिले षटक टाकण्यासाठी आलेल्या दीपक चहरने दुसऱ्याच चेंडूवर डेव्हिड वॉर्नरला अजिंक्य रहाणेकरवी झेलबाद केले. दिल्लीच्या कर्णधाराने दोन चेंडूंचा सामना केला आणि त्याला खातेही उघडता आले नाही. चहरचा बॅक ऑफ लेन्थ बॉल ऑफ स्टंपच्या बाहेर होता, वॉर्नर कव्हर एरियात तो मारायला गेला आणि रहाणे सोपा झेल घेतला. चहरने तिसऱ्या षटकात दिल्लीची दुसरी विकेट घेतली. ११ चेंडूत १७ धावा करणाऱ्या सॉल्टला अंबाती रायुडूने झेलबाद केले.

चेन्नईसाठी या सामन्यात एकाही फलंदाजाने ३० धावांचा टप्पा ओलांडला नाही. शिवम दुबेने १२ चेंडूत सर्वाधिक २५ धावा केल्या. ऋतुराज गायकवाडने २४, अंबाती रायडूने २३, रवींद्र जडेजा आणि अजिंक्य रहाणेने २१-२१ धावा केल्या. डेव्हॉन कॉनवेने १० आणि मोईन अलीने सात धावा केल्या. कर्णधार महेंद्रसिंग धोनीने शेवटच्या षटकात वेगवान धावा केल्या. त्याने नऊ चेंडूत २० धावा केल्या. यादरम्यान त्याने एक चौकार आणि दोन षटकार मारले. दिल्ली कॅपिटल्सकडून मिचेल मार्शने तीन आणि अक्षर पटेलने दोन विकेट घेतल्या. खलील अहमद, ललित यादव आणि कुलदीप यादव यांना प्रत्येकी एक यश मिळाले.

### पाथिरानाची शानदार गोलंदाजी

**» चौथ्या षटकाच्या पहिल्या चेंडूवर दिल्लीची तिसरी विकेट पडली. मिचेल मार्श ५ धावांवर धावबाद झाला. यानंतर मनीष पांडे आणि रिले रुसो यांच्यात चौथ्या विकेटसाठी ५९ धावांची भागीदारी झाली. १३व्या षटकाच्या शेवटच्या चेंडूवर मथीशा पथिरानाने ही भागीदारी तोडली. त्याने मनीष पांडेला एलबीडब्ल्यू आऊट केले. पांडेने २९ चेंडूत २७ धावा केल्या. पंधराव्या षटकात जडेजाने रुसोला पाथिरानाकडून झेलबाद केले. रुसोने ३७ चेंडूत ३५ धावांची संथ खेळी खेळली.**

### अक्षरने 21 धावा केल्या

**» १८व्या षटकात पथिरानाने अक्षर पटेलला पॅव्हेलियनमध्ये पाठवले. त्याने १२ चेंडूत २१ धावांची खेळी केली. रहाणेने अक्षरचा झेल घेतला. रिपल पटेल १९व्या षटकातील ५व्या चेंडूवर धावबाद झाला. त्याने १६ चेंडूत ९ धावा केल्या. शेवटच्या षटकात पथिरानाने ललित यादवला क्लीन बोल्ड केले. ललितने ५ चेंडूत १२ धावा केल्या. अमन खान २ धावा करून नाबाद राहिला. चेन्नईकडून पथिरानाने ३ बळी घेतले. तर दीपक चहरने २ आणि रवींद्र जडेजाने १ बळी घेतला.**

---

## ‘बीसीसीआय’ला मिळणार अब्जावधीचा हिस्सा

। नवी दिल्ली ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

‘बीसीसीआय’ला २०२३ ते २०२७ या पाच वर्षांसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) महसुलातील वाटा म्हणून तब्बल ९ अब्ज रुपये अपेक्षित आहेत. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाची (बीसीसीआय) तिजोरी २०२३ ते २०२७ या कालावधीत आणखी भरभरून वाहणार आहे. ‘बीसीसीआय’ला २०२३ ते २०२७ या पाच वर्षांसाठी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेकडून (आयसीसी) महसुलातील वाटा म्हणून तब्बल ९ अब्ज रुपये अपेक्षित आहेत.

अर्थात, ही आकडेवारी अजून निश्चित नाही. मात्र, ‘आयसीसी’च्या एका अधिकृत सूत्राने दिलेल्या माहितीनुसार ‘बीसीसीआय’ला ‘आयसीसी’च्या वार्षिक महसूलातील ३८.५० टक्के इतका वाटा मिळतो. ‘आयसीसी’ला या कालावधीत ६ कोटी डॉलर महसूल अपेक्षित असून, या टक्केवारीनुसार जगातील सर्वात श्रीमंत क्रिकेट मंडळ असणाऱ्या ‘बीसीसीआय’ला २ कोटी ३१ लाख डॉलर इतके उत्पन्न अपेक्षित आहे.

हा एक प्रस्तावित आराखडा आहे. ते क्रिकेट मानांकन,‘आयसीसी’ स्पर्धांमधील कामगिरी आणि व्यावसायिक खेळातील योगदानावर अवलंबून असते. यामध्ये व्यावसायिक विभागात ‘आयसीसी’ला मोठा महसूल मिळवून देण्यात ‘बीसीसीआय’चा महत्त्वाचा वाटा आहे, असे ‘बीसीसीआय’च्या सूत्राने सांगितले. एका संकेतस्थळावर दिलेल्या माहितीनुसार ‘आयसीसी’च्या महसूल वाटपातील इंग्लंडचा वाटा ६.८९ टक्के, ऑस्ट्रेलियाचा ६.२५ टक्के, तर, पाकिस्तानचा ५.७५ टक्के इतका वाटा आहे.

## ताश्कंदमध्ये भारतीय बॉक्सर्सनी रचला इतिहास

### » दीपक भोरिया, मोहम्मद हुसामुद्दीन, निशांत देव यांनी पदक केले निश्चित

। कोलकाता ।
महाईन्यूज । वृत्तसंस्था ।

**दीपक भोरिया, मोहम्मद हसमुद्दीन आणि निशांत देव यांनी बुधवारी आयबीए पुरुषांच्या जागतिक बॉक्सिंग स्पर्धेत भारतासाठी तीन पदके निश्चित केली. दीपकने ५१ किलो वजनी गटात किर्गिस्तानच्या नुरझिगित दुशेबाएवचा ५-० असा पराभव केला. निशांतने एकमताने निर्णय घेत क्यूबाच्या जॉर्ग क्युलरला अशाच प्रकारे पराभूत केले. हसमुद्दीनने ५७ किलो वजनी गटात बल्गेरियाच्या जे डियाज इबानेझचा ४-३ असा पराभव केला. यासह, जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये प्रथमच भारतीय पुरुष बॉक्सरने तीन पदके निश्चित केली आहेत.**

दीपक भोरिया, मोहम्मद हसमुद्दीन आणि निशांत देव यांच्या आधी भारताच्या पुरुष बॉक्सर्सनी जागतिक बॉक्सिंग चॅम्पियनशिपमध्ये 7 पदके जिंकली आहेत. विजेंदर सिंग (२००९ मध्ये कांस्य), विकास कृष्णन (२०११ मध्ये कांस्य), शिव थापा (२०१५ मध्ये कांस्य), गौरव बिधुरी (२०१७ मध्ये कांस्य), मनीष कौशिक (२०१९ मध्ये कांस्य), अमित पंघल (२०१९ मध्ये रौप्य) आणि आकाश कुमार. (२०२१ मध्ये कांस्य) भारताला पदक मिळवून दिले आहे. तिन्ही बॉक्सर शुक्रवारी उपांत्य फेरीत खेळतील. उपांत्यपूर्व फेरीतील विजय म्हणजे तिन्ही बॉक्सर किमान कांस्य पदकासह परततील. यापूर्वी, भारताची सर्वोत्तम कामगिरी २०१९ मध्ये होती, जेव्हा भारताने अमित पंघलच्या रौप्य आणि मनीष कौशिकच्या कांस्यपदकासह दोन पदके जिंकली होती. बुधवारी प्रथम रिंगमध्ये प्रवेश करताना दीपकने फ्लायवेट प्रकारात किर्गिस्तानच्या नुरझिगित दुशेबाएवचा ५-० असा एकमताने पराभव करून आपली प्रभावी कामगिरी सुरू ठेवली. हा वजन वर्ग पॅरिस ऑलिम्पिकचाही भाग आहे.

दीपक म्हणाला, “आमची योजना डावीकडून खेळायची आणि प्रतिस्पर्ध्यापासून अंतर राखायची होती. माझे मनोबल उंचावले आहे कारण मी उपांत्य फेरीत पोहोचलो आहे.” दीपक आता शुक्रवारी उपांत्य फेरीत फ्रान्सच्या बी बेनामाशी भिडणार आहे. दोन वेळा राष्ट्रकुल स्पर्धेतील कांस्यपदक विजेत्या हुसामुद्दीनला बल्गेरियाच्या जे डियाझ इबानेझविरुद्ध घाम गाळावा लागला. त्याने हा सामना ४-३ अशा फरकाने जिंकला.



### दीपकने सुरुवातीपासूनच आक्रमक दृष्टिकोन

**» दीपकने चढाईत अशा प्रकारे वर्चस्व गाजवले की रेफ्रींना दुशेबाएव्हला दोनदा मोजावे लागले. भारतीय बॉक्सरने सुरुवातीपासूनच आक्रमक दृष्टिकोन स्वीकारला आणि अचूक पंचेस केले. ०-५ ने पिछाडीवर पडलेल्या दुशेबाएवने दुसऱ्या फेरीत आक्रमक खेळ केला, पण दीपकने उत्कृष्ट बचाव आणि प्रतिआक्रमणांनी त्याला मागे टाकले. पहिल्या दोन फेऱ्या जिंकल्यानंतर दीपकने तिसऱ्या आणि अंतिम फेरीत बचावात्मक दृष्टिकोन स्वीकारला आणि प्रतिस्पर्ध्याला एकही संधी दिली नाही.**